ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ९० वा ❑ शुक्र वार दि.१६ मे २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

# विदर्भ भूषण...

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

विदर्भ भूषण म्हणून ओळखले जाणारे विदर्भाचे न्या.भूषण रामकृष्ण गवई यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश पदाची शपथ घेतली. राष्ट्रपती भवनात हा शपथविधी कार्यक्रम पार पडला.विशेष म्हणजे आईचा आशीर्वाद घेतल्यानंतर न्या. गवई यांनी सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली ते सर्वोच्च न्यायालयाचे ५२ वे सरन्यायाधीश बनले आहेत. त्यांच्याआधी संजीव खन्ना हे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश होते. न्या. गवई यांचा प्रवास अमरावतीतून सुरू झाला. पुढे ते नागपूरमार्गे दिल्लीपर्यंत पोहोचले. अमरावतीचे सुपुत्र सरन्यायाधीश झाल्याने अमरावतीत फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष साजरा झाला. न्या. गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी अमरावतीत झाला. त्यांचे वडील रामकृष्ण सूर्यभान गवई हे आंबेडकरी चळवळीच्या प्रमुख नेत्यांपैकी एक होते. भूषण हे तीन भावंडांपैकी ज्येष्ठ होते. वडील राजकारण, समाजकारणात सक्रिय असल्याने बालपणापासून त्यांना सामाजिक कार्याचा वारसा लाभला.

**शालीन आणि सुसंस्कृत**

भूषण गवई यांना कोणी घरी भेटायला आले तर त्या व्यक्तीला वाटणारही नाही की ही व्यक्ती इतक्या मोठ्या पदावरील व्यक्ती आहे. ते अत्यंत शालीन आणि सुसंस्कृत असून घरात कोणी माणूस आला आणि जर ते घरी एकटे असले तर स्वत: त्याला उठून पाणी आणून देतात. मी खुर्चीमध्ये विराजमान असतो तेव्हा मी न्यायमूर्ती असतो आणि खुर्चीत विराजमान नसतो तेव्हा मी सर्वसामान्य माणूस असतो असे भूषण गवई नेहमी सांगतात असे त्यांची आई कमलताईनी. एका मुलाखतीत सांगितले. भूषण गवई यांचे वडील रा.सु गवई हे नाव महाराष्ट्राला चांगलेच परिचित आहे. कमलताईनी सांगितले की जेव्हा भूषण गवई वडिलांसोबत असायचे तेव्हा ते मुंबई मध्ये एखाद्या सर्वसामान्य कार्यकर्त्यासारखेच काम करायचे. त्यावेळी जमिनीवर चादर अंथरूनही ते झोपलेले आहे, आणि याबद्दल त्यांनी कधीही तक्रार केली नाही. न्यायाच्या अपेक्षेत आलेल्या प्रत्येकाला ते न्याय देतील याची मला खात्री आहे असे कमलताईनी म्हटले आहे.

**१९८७ मध्ये वकिलीला सुरूवात...**

१९८७ ते १९९० दरम्यान त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली केली. त्यानंतर नागपूर खंडपीठात त्यांनी आपली प्रॅक्टिस केली. ते घटनात्मक आणि प्रशासकीय कायद्यात तज्ज्ञ होते. त्यानंतर त्यांनी नागपूर महानगरपालिका, अमरावती महानगरपालिका आणि अमरावती विद्यापीठासाठी वकील म्हणून काम पाहिलं. तसंच विदर्भातील विविध स्वायत्त संस्था आणि महानगरपालिकांचं प्रतिनिधित्व केलं.

**२००५ मध्ये बनले न्यायाधीश**

न्या. गवई यांनी १९९२ ते १९९३ मध्ये नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त लोक अभियोक्ता म्हणून काम सुरू केलं. २००० मध्ये ते सरकारी वकील आणि लोक अभियोक्ता बनले. १४ नोव्हेंबर २००३ रोजी त्यांची मुंबई उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर पुढे १२ नोव्हेंबर २००५ रोजी ते न्यायाधीश बनले. त्यांनी मुंबई, नागपूर, औरंगाबाद आणि पणजीमध्ये असणाऱ्या खंडपीठांवर विविध प्रकारच्या खटल्यांचं कामकाज पाहिलं. २४ मे २०१९ रोजी त्यांची भारताच्या सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली.

गेल्या सहा वर्षांत न्या. गवई यांनी सुमारे ७०० खंडपीठांवर काम केलं. यामध्ये घटनात्मक, प्रशासकीय, नागरी, फौजदारी, व्यावसायिक, लवाद, वीज, शिक्षण आणि पर्यावरण कायद्याशी संबंधित खटले समाविष्ट आहेत. त्यांनी जवळपास ३०० निकाल दिले. यामध्ये कायद्याचं शासन राखणारे आणि नागरिकांचे मूलभूत, मानवी आणि कायदेशीर हक्कांचे संरक्षण करणारे महत्त्वपूर्ण निकाल आहेत.

**महत्वाचे खटले**

न्या. भुषण गवई यांच्या उल्लेखनीय निकालांपैकी, न्या. गवई ३७० कलम रद्द करण्याच्या वैधतेला मान्यता देणाऱ्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यामुळे जम्मू आणि काश्मीरचे विशेष दर्जा रद्द झाला आणि त्या प्रदेशाची पुनर्रचना झाली. तसंच, ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांच्याविरुद्धच्या अवमान खटल्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यामध्ये त्यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि न्यायिक जबाबदारी यासारखे महत्त्वाचे मुद्दे हाताळले होते. याशिवाय, त्यांनी २०१६ च्या नोटबंदी योजनेच्या समर्थनार्थ बहुमताचा निकाल लिहिला होता.

राज्यांना अनुसूचित जातीमध्ये उप-वर्गीकरण करण्याचा घटनात्मक अधिकार आहे, असे ६:१ संदर्भात सर्वमान्य सात न्यायाधीशांच्या घटनापीठातही न्यायमूर्ती गवई होते. न्यायमूर्ति १ न्यायमूर्ती गवई यांच्या खंडपीठाने डोझर न्यायप्रणाली एक महत्त्वाचा निर्णय दिला होता. राष्ट्रीय स्तरावरील मार्गदर्शक तत्त्वे पुढे चालू ठेवताना त्यांनी सांगितले की, कारण दाखवा नोटीस शिवाय पुढेही पुढे जाऊ नये. शिवाय ज्यांच्यावर खरेदी केली जात आहे त्यांना उत्तर १५ दिवसांचा वेळ दिला. असा निर्णय त्यांनी दिला होता.

राहुल गांधी यांना दिलासा दिला. तो गवई यांच्या निर्णयच. त्याच सामाजिक कार्ये तिस्ता सेटलवाड यांना जामीन, दिल्ली दारू घोटाळ्यात बीआरएस नेत्या के. कविता त्यांना जामीन यांनी दिला. न्यायमूर्ती गवई पर्यावरण विषयासाठी हरित खंडपीठाचे नेतृत्व करत त्यांनी जंगले आणि झाडांची बेकादेशीर तोडणी रोखण्यासाठी अनेक कठोर आणि कठोर निर्णय दिलेले आहेत.

# प्रगत विज्ञान-तंत्रज्ञानातील शोध याचे मूळ समृद्ध इतिहास आणि सांस्कृतिक परंपरेत - डॉ. वि. ल. धारूरकर

## विद्यापीठातील ऑन जॉब ट्रेनिंग आणि कौशल्य विकासवरील व्याख्यान रंगले

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर –** प्रगत विज्ञान आणि तंत्रज्ञानातील शोध हे समृद्ध इतिहास आणि सांस्कृतिक परंपरांतून प्रकट होतात. त्या आधारे प्रगत शास्त्रीय अभ्यास करून तंत्रज्ञानाचा विकास केला पाहिजे, असे मत माजी कुलगुरू व प्रसिद्ध विचारवंत डॉ. यांनी सोमवारी, १२ रोजी येथे व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास आणि प्राचीन भारतीय संस्कृती विभागात ऑन जॉब ट्रेनिंग आणि कौशल्य विकास या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. पुष्पा गायकवाड होत्या.



डॉ. धारूरकर म्हणाले, अल्बर्ट आईन्स्टाईन यांनी असे प्रतिपादन केले होते की, मानवी विकासाचे कितीही प्रयत्न झाले असले तरी आपण अजूनही नवे शोध आणि नव्या कल्पनांच्या विकासाबाबत कमालीचे दरिद्री आहोत. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी भारतात तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला व त्या आधारे विदेशात व्याख्याने दिली. त्यांनी असे मत मांडले होते की, जेथे प्राचीन तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास होतो, तेथेच प्रगत तंत्रज्ञानही जन्माला येते. आपल्या प्रतिभाशक्तीचा उपयोग आपणास अत्यंत कल्पकतेने आणि चतुराईने करावा लागेल. तसे झाले तरच कौशल्याचा विकास होणे शक्य आहे. महात्मा गांधी यांनी बिर्ला भवन येथे १९३७ साली केलेल्या एका भाषणात असे सांगितले होते की, भारताचे उज्वल भवितव्य कशात असेल तर ते कौशल्य विकासात आहे. त्यामुळे नव्या शैक्षणिक धोरणात शालेय जीवनापासूनच कौशल्य विकासावर भर देण्यात आला आहे.

सामाजिक शास्त्रे तप्त मुशीतून विकसित सामाजिक शास्त्रांमध्ये कौशल्ये कुठे आहेत, असा प्रश्न लोक विचारतात तो चुकीचा गैरसमज आहे असे सांगून डॉ. धारूरकर पुढे म्हणाले, सर्व सामाजिक शास्त्रांना कौशल्याचे अंग आहे. किंबहुना सामाजिक शास्त्रे ही सामाजिक अनुभवाच्या तप्त मुशीतून विकसित झाली आहेत. त्यामुळे इतिहासासारख्या सामाजिक शास्त्राचा संबंध पुरातत्त्व विद्या, पर्यटन, उदार कला या ज्ञानशाखांशी आहे. पुरातत्त्व संशोधनामध्ये गावोगावी केले जाणारे सर्वेक्षण असो किंवा प्राचीन स्थळांचे अध्ययन असो, याबाबतीत पर्यटनासारख्या क्षेत्रात सुद्धा पुरातत्व विद्येचा आणि इतिहासाचा संबंध येतो.

**वस्तूसंग्रहालये देशाचे भूषण**

जगातील सर्व देशांमध्ये वस्तूसंग्रहालये ही एक इतिहासावर आधारलेली ज्ञानशाखा उदयास आली आहे. चांगली वस्तूसंग्रहालये ही त्या देशाचे भूषण असतात. त्या आधारे मोठ्या रोजगार संधी उपलब्ध होत आहेत. जुन्या ऐतिहासिक स्थळांमध्ये लेणी मंदिरे, किल्ले, गडकोट यांची माहिती देण्यासाठी चांगले मार्गदर्शक किंवा गाईड यांची कमतरता आहे. त्याचे प्रशिक्षण घेऊन उत्तम रोजगार मिळू शकतो, असे धारूरकर म्हणाले. या सर्व कौशल्यांच्या विकासासाठी ऑन जॉब ट्रेनिंगची नितांत गरज आहे. ऑन जॉब ट्रेनिंग मधूनच सातत्याने त्यांची निष्णातता विकसित होते. अलीकडे उदार कला शिक्षणातसुद्धा ऑन जॉब ट्रेनिंगला अत्यंत महत्त्व दिले जात आहे. पर्यटन क्षेत्रातील विविध विद्याशाखांचा विकास याच दिशेने होत आहे. विशेषत: अतिथी उद्योग असो किंवा पर्यटन क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञानाचे नवनवे बदलते स्वरूप असो या सर्व बाबतीत प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि सांस्कृतिक अनुभवाचा सहभाग याला विशेष महत्त्व आहे असे सांगून डॉ. धारूरकर यांनी पुरातत्त्व पर्यटन तसेच नाणेशास्त्र आणि म्युझियालॉजी इत्यादी शास्त्रांची उपयुक्त माहिती दिली. पुरातत्त्वाप्रमाणेच या नव्या ज्ञानशाखांत असलेल्या रोजगारांसाठी मनुष्यबळाची अत्यंत कमतरता असून, देशाचा संपन्न सांस्कृतिक वारसा पाहता अशा मनुष्यबळ विकासासाठी ऑन जॉब ट्रेनिंगचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग मोठ्या निष्ठेने करत असल्याबद्दल त्यांनी इतिहास विभागाचे कौतुक करून प्रशंसोद्गार काढले.

**प्रश्नोत्तराने यशस्वी सांगता**

प्रश्नोत्तरानंतर कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली. याप्रसंगी झालेल्या चर्चेमध्ये निवृत्त सेवा योजन अधिकारी शिरसाठ, पूनम कुशेर, अश्विन जोगदंड, डॉ. संदेश कांबळे, प्रसेनजित मानवर इत्यादी सहभागी झाले होते. प्रास्ताविक डॉ. बिना सेंगर यांनी केले. डॉ. संजय पाईकराव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

डॉ. पुष्पा गायकवाड यांनी डॉ. धारूरकरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुवर्णमाला म्हस्के यांनी, तर प्रा. राहुल बचाटे यांनी सर्वांचे आभार मानले.

# वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडिया मध्ये कवी विजो यांच्या साहित्यिक उपक्रमाची नोंद

ज्योतिर्मय साहित्य

**नवी मुंबई/ प्रदीप बडदे–** दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, ज्यामुळे तिच्या विकासाला एक नवा आयाम मिळाला आहे. हा निर्णय केवळ भाषिक ओळखीतच नाही तर सांस्कृतिक आणि सामाजिक स्तरावरही महत्त्वाचा ठरला आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळवणे म्हणजे त्या भाषेतील साहित्य कला आणि संस्कृतीच्या गौरवाला मान्यता मिळवणे आहे. अनेक लेखक आणि कवी यांच्या संशोधनाला आणि अभ्यासाला त्यामुळे चालना मिळाली आहे. त्यातच एक नाव म्हणजे विजय जोशी (विजो), डोंबिवली. ते कवी, गझलकार, गीतकार, समीक्षक आहेत. विजो या टोपणनावाने ते कविता लेखन करतात आणि साहित्यात परिचित आहेत. काव्यगुरु या उपाधीने सन्मानित आहेत. गेली जवळपास २५ वर्षे साहित्य क्षेत्रात सक्रिय कार्यरत आहेत. त्यांनी आजवर एकूण ५५० पेक्षा जास्त मराठी कविता लिहिल्या आहेत. छंदोबद्ध आणि वृत्तबद्ध कविता, गझल, बालकविता, गीत लेखन आणि मालवणी बोली भाषेतील कविता अशा विविध प्रकारांमध्ये त्यांचे कविता लेखन आहे. अनेक साहित्यिक संस्थांवर ते सक्रीय कार्यरत आहेत. ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून त्यांचा सहभाग होता. विजय जोशी (विजो) यांनी सध्या केलेले एक महत्त्वाचे कार्य म्हणजे ‘‘वृत्ताई‘‘ हा उपक्रम. यात काव्यपंक्तीचे विविध २५ वृत्तांमध्ये त्यांनी लेखन केले आहे. आईचे स्थान आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात अनन्यसाधारण आहे. आईची महती सांगणारी ‘‘वृत्ताई‘‘ – काव्यपंक्ति / लक्षणपंक्ती त्यांनी विविध २५ वृत्तांमध्ये मांडून एक जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. ही वृत्ताई विशेषत: वृत्तबद्ध कविता शिकणाऱ्या नवोदितांसाठी आणि इतर कवींसाठीही विविध वृत्तांची लक्षणगीते म्हणून मार्गदर्शक ठरणार आहे. यांच्या या विशेष कार्याची नोंद वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडियाच्या चीफ एडिटर सुषमा नार्वेकर यांनी घेऊन, सर्टिफिकेट आणि मेडल देऊन कवी विजो यांचा सन्मान केला आणि पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.




# कॅनडात कार्नींचे पुनरागमन : भारतासाठी शुभसंकेत

ज्योतिर्मय साहित्य

**अखेर मार्क कार्नी यांनी कॅनडाच्या राजकीय हॉकीमध्ये पेनल्टी कॉर्नरचे रूपांतर गोलमध्ये केले. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात त्यांनी शांत, मृदू आणि सौजन्यशील प्रतिक्रिया दिल्या. त्यामुळे त्यांच्या राजकारणास यश आले. याच कुशलतेने ते समस्यांचा चक्रव्यूह अभिमन्यूप्रमाणे भेदतील अशी चिन्हे दिसते आहेत.**

कॅनडातील संघीय निवडणुकीचे निकाल मार्क कार्नी यांच्या पुनरागमनावर शिक्कामोर्तब करणारे आहे आणि शिवाय भारताच्या हिताच्यादृष्टीने विचार करता शुभसंकेत देणारे आहेत. कॅनडाच्या सार्वत्रिक निवडणुकीत लिबरल पक्षाचे पुनरागमन हा या पक्षाच्या व्यूहरचनात्मक डावपेजांचा आणि वस्तुनिष्ठ धोरणाचा विजय म्हटला पाहिजे. कार्नी यांनी घोषित केलेल्या राष्ट्रहिताच्या योजनांना मतदारांनी चांगला प्रतिसाद दिला आहे आणि त्यांच्या बाजूने कौल दिला आहे. त्यांच्या या विजयाचे यथार्थ विश्लेषण केले असता अनेक पैलू समोर येतात. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे भारताच्यादृष्टीने कार्नी यांचा हा विजय शुभसूचक आहे. दहशतवादाशी संघर्ष करण्यात ते भारताला पूरक ठरतील. तसेच कॅनडातील भारतीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांचे धोरण फलदायी ठरेल. चिखलात रूतून पडलेला भारत-कॅनडाचा व्यापार रथ पुन्हा वेगाने गती घेईल.

तेथील परंपरेनुसार मतदान केंद्रे १२ तास खुली ठेवण्यात आली आणि लोकांना आपल्या सोयीने मतदान करता आले हाही तेथील लोकशाहीचा एक जमेचा पैलू होय. कॅनडाच्या निवडणूक निकालाचे राजकीय समाजशास्त्रदृष्टीने विश्लेषण केले असता हे स्पष्ट होते की, मार्क कार्नी यांनी मोठ्या चतुराईने डाव टाकला, कॅनडाचे समाजमन ओळखले आणि लोकांची मने जिंकली. गोंधळलेल्या परिस्थितीत मृदूभाषी, शांत आणि संयत नेता हाच वादळातून वाट काढेल यावर मतदारांनी विश्वास व्यक्त केला. त्यामुळे कार्नी विजयी झाले. आता ३ मतांनी त्यांच्या पक्षाची संख्या जरी कमी असली तरी देखील ते भविष्यात निश्चितच चांगले डाव टाकतील आणि सरकारला स्थैर्य देतील असे वाटते.

**क्षितिजावरचा तारा:**

आरंभीच्या निकालाचे कल हे सांगत होते की, लिबरल पक्ष आणि कार्नी यांचे पुनरागमन होत आहे आणि हाच कल पुढे दीर्घकाळ कायम राहिला आणि शेवटी त्यांचा राजकीय तारा कॅनडाच्या क्षितिजावर प्रभावीपणे उदयास आला आणि चमकू




लागला. लिबरल पक्षाचे नशीब नाट्यमयपणे बदलण्याचे श्रेय पंतप्रधान पदाचे उमेदवार असलेले मार्क कार्नी यांच्याकडे जाते. कारण त्यांनीच त्या पक्षाला आणि कॅनडाला राजकीय वादळातून बाहेर काढले आहे. हाऊस ऑफ



कॉमन्समधील जागा ३३८ वरून ३४३ वाढल्या होत्या. त्यामुळे या निकालातून एक नवा राजकीय नकाशा प्रकट झाला आहे. जगमीत सिंग यांनी त्यांच्या ब्रिटिश कोलंबिया बर्नाबी सेंट्रल मतदार संघाच्या जागेवर मार खाल्ला आणि ते तिसर्या क्रमांकावर पोहोचले. त्यांनी एनडीपी नेतेपदाचा राजीनामा दिला तर ग्रीन पार्टीचे नेते जोनाथन पेडनॉल्ट हे क्बेबेकोइस मतदार संघात पाचव्या क्रमांकावर राहिले. ग्रीन पक्षाच्या सहनेत्या एलिझाबेथ मे यांनी आपली जागा कायम राखली. मार्क कार्नी यांचा निवडणुकीच्या रणांगणावर पहिलाच विजय होता आणि त्यांच्या नेतृत्वावर मतदारांनी शिक्कामोर्तब केले.

कॅनडामधील राजकीय पक्षांची कामगिरी व त्यांना आलेले यश याचा तौलनिक अभ्यास केला असता, मार्क कार्नी यांचा पक्ष कसा यशस्वी झाला हे लक्षात येते. फेडरल निवडणुकीत मार्क कार्नी त्यांच्या पक्षाने निसटते का होईना बहुमत प्रस्थापित केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली लिबरल पक्षाने कात टाकली आणि जस्टीन ट्रुडो यांनी जे डॅमेज केले होते ते कंट्रोल करण्यात कार्नी यशस्वी झाले हे लक्षात घेतले पाहिजे.

**स्थैर्यासाठी कौल:**

पियरे पॉइलिव्हरे यांना खुद्द स्वतःची जागाही गमवावी लागली हे कार्नी यांचे मोठे यश होय. एनडीएचे जगमीत सिंग यांनाही पराभवाची धूळ चाखावी लागली. डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणाचा निवडणुकीवर मोठा दूरगामी परिणाम झाला. शिवाय ट्रम्प यांनी कॅनडाला आपल्या राज्यात सामील करून घेण्याची जी घोषणा केली होती त्याचे तीव्र पडसाद उमटले आणि कॅनडाच्या लोकांनी कार्नी यांच्या पक्षाच्या पदरात मते टाकली. जागतिक ताणतणावाच्या काळात कॅनडातील मतदारांनी स्थैर्याला कौल दिला ही गोष्ट विशेषत्वाने अधोरेखित केली पाहिजे. कार्नी यांनी अमेरिकेपासून कॅनडाचे स्वातंत्र्य टिकविण्यावर भर दिला आणि त्याला लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. मार्क कार्नी यांनी कॅनेडियन राष्ट्रवाद जोपासला तसेच देशाचे अर्थकारण स्थिर करण्याचे अभिवचन दिले आणि त्यांनी कुठल्याही प्रकारच्या हिंसक, दहशतवादी कृत्यापासून देशाला दूर ठेवण्याचे अभिवचन दिले हीही एक जमेची गोष्ट होय. ट्रुडो जेथे चुकले तेथे कार्नी नक्कीच यशस्वी ठरले.

**(क्रमशः)**





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com


## आनंदी पहाट...

### व्यक्तिमत्वाचा विकास मानसिक स्वास्थ्यावर ठरतो

**ज्योतिर्मय साहित्य**

जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर अगदी बालपणापासून वृद्धापर्णापर्यंत मानसिक स्वास्थ्य महत्वाचं असतं. आपल्या जीवनात आपण मानसिक स्वास्थ्यविषयक समस्यांचा सामना करत असलो, तर आपली विचारसरणी, अंतर्मनाची भावना आणि वागणूक ह्या सर्वांवर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. मानसिक स्वास्थ्यासाठी समस्या निर्माण करणारे नकारात्मक विचार जरी ते सामान्य आहेत असं वाटत असलं तरीही सकारात्मक विचारांच्या माध्यमातून आपण निश्चितच परिवर्तन घडवून आणू शकतो. आपल्या व्यक्त होण्यातून आपलं व्यक्तिमत्वाचं वेगळेपण त्यांतच सामावलेलं असतं. प्रत्येक व्यक्तीमध्ये अनेक गुण असतात; त्यातील काही गुण इतरांसारखे देखील असतात, तर काही गुण इतरांपेक्षा वेगळे, निराळे असतात. खरं तर ह्या वेगळ्या गुणांमुळेच ती व्यक्ती ओळखता येते. म्हणूनच, व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्तीमधील वैविध्यपूर्ण गुणविशेषांचा वैशिष्ट्यपूर्णसंच होय. व्यक्तिमत्व विकास हि एक व्यापक संकल्पना आहे. त्यामध्ये, शारीरिक विकास, भावनिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक विकास, आत्मिक विकास अशा अनेक बाबींचा समावेश असल्याचं दिसून येत असतं. सध्याच्या २१ व्या शतकात व्यावसायिक क्षेत्रात आपली प्रतिष्ठा वाढवण्यासाठी फक्त उच्च शिक्षण असून चालत नाही; त्यासोबत आपल्यातील आत्मविश्वास सुद्धा महत्वाचा ठरत असतो. आपल्या व्यक्तिमत्वाचा किती प्रभाव पडतो, ह्यावर आपल्या कामाचा आलेख ठरविला जात असतो. आपण कोणत्याही व्यावसायिक क्षेत्रात काम करत असताना आपल्या वक्तृत्वाचा खूप मोठा प्रभाव पडत असतो. आपण आपले विचार, विषय किती तार्किक पद्धतीने, अगदी सोप्या भाषेत, सोयीस्कररित्या, न अडखळता, धीटपणाने आणि समोरच्या व्यक्तीला पटतील असे मांडू शकल्यास आपल्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव निश्चितच समोरच्या व्यक्तीवर पडतो. समोरची व्यक्ती बोलत असताना तेवढ्याच शांततेनं, त्या व्यक्तीला ऐकून घेण्याची क्षमता सुद्धा आपल्यात असल्यास, आपल्या व्यक्तित्वाला एक आकार, एक वेगळं महत्व मिळू शकतं.

## मानवी मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम




**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्याला वनवासात जावे लागणार आहे हे कळल्यावर क्षणभर त्यांच्या चेहरा विषादयुक्त होतो. पण ते रागाने आरडाओरड वा आक्रस्ताळेपणा करीत नाहीत. त्या विपरीत परिस्थितीही मनावर नियंत्रण मिळवतात.

त्यांनी महापराक्रमी, बलाढ्य अशा रावणावर विजय मिळवला यापेक्षाही आपल्या कर्तव्यपूर्तीसाठी आपल्या भावनांवर विजय मिळवणे हीच खरी रामायणातील शौर्यकथा आहे असे यानिमित्ताने म्हणावेसे वाटते. म्हणूनच मानवी देहातील तेज म्हणजे श्रीराम !श्रीरामांनी कुठेही स्वैराचार वा अविचार केला नाही. मर्यादांचा खरा अर्थ श्रीरामांनी आपल्याला शिकवला आहे. मर्यादा पाळणे म्हणजे दुबळेपणा नव्हे. आजच्या काळात, जिथे संयम हा कमकुवतपणा समजला जातो आणि आत्मसंयम हा अडसर मानला जातो, तिथे श्रीरामांनी घालून दिलेला मर्यादा पुरुषोत्तमाच्या आदर्शाचा पुनर्विचार करण्याची गरज आहे.




श्रीरामांनी रावणाचा पराभव केला, युद्ध जिंकले म्हणून केवळ ते मोठे ठरत नाहीत तर त्यांचा स्वतःवरील विजय, आत्मसंयम किंवा आत्मनियंत्रणांमुळे ते महान ठरतात असे मला वाटते.

ते एक आदर्श मित्र झाले. जातीपातीच्या मर्यादा ओलांडून त्यांनी सर्वांना आपले मित्र म्हणून हृदयाशी धरले. त्यांना कधीच अंतर दिले नाही. त्यांच्या सर्वसमावेशक दृष्टीचे ते उदाहरण आहे. आदर्श पुत्र, आदर्श पिता, आदर्श पती, आदर्श राजा म्हणून घालून दिलेल्या त्यांच्या उदाहरणाचा आणि आदर्शांचा सर्वकाळी एक अनुकरणीय उदाहरण म्हणून विचार करावा असेच ते आहे. ते एक आदर्श शत्रू देखील ठरतात. मरणानंतर वैर संपते म्हणून रावणाचा विधिपूर्वक अंत्यसंस्कार करण्यास त्यांनी बिभीषणाला सांगितले. रावणाच्या मृत्यूपूर्वी लक्ष्मणाला त्याचा उपदेश घेण्यासाठी पाठवले.

श्रीरामांना देव म्हणून मानणं सहज आहे. पण त्यांच्यासारखं माणूस होणं ही खरी साधना आहे. कारण ते आदर्श आहेत जे उंच आकाशात नाहीत, तर आपल्या प्रत्येक कृतीत उतरवता येतील असे. त्यांचं जीवन सांगतं की संकटं तर येतीलच, पण संयम हरवू नका. कोणत्याही परिस्थितीत आपलं कर्तव्य, आपला धर्म सोडू नका.

ते सांगतात की भावना असाव्यात, पण त्यावर विवेकाचं वर्चस्व असावं. आयुष्यात अनेक मोहाचे, लोभाचे क्षण येतील, पण तुम्ही विचलित होऊ नका. आपला ध्येयतारा सदैव डोळ्यासमोर असेल तर माणूस विचलित होत नाही. तो कर्तव्यपथावर वाटचाल करीत राहतो. विमोह त्यागून कर्मफलाचा सिद्ध होई पार्था कर्तव्याने घडतो माणूस जाणून पुरुषार्था . हीच शिकवण आपल्याला राम आणि कृष्णाचं जीवन देतं.



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

### मृत्यूनिरूपण


**ज्योतिर्मय साहित्य**

५९ ओव्या मध्ये समर्थांनी, या निरूपणाची ओळख करून दिली आहे. जसे ज्याचे कर्म असेल तशाच स्वरूपात त्याला अक्षरशः क्षणोक्षणी सामोरं जावं लागेल. मरण आजची घटना ऊद्या वर ढकलू असं होऊ शकत नाही.

१. मरण हे कुणालाही चुकलं नाही. फक्त ते मागेपुढे येते. अंतकाळी कोणी मोठा आहे शुर आहे लढ्वया आहे, बलाढ्य आहे धनाढ्य आहे, प्रतापी आहे, भूपती आहे, चक्रपती आहे, झुंजार आहे. रागीट आहे, विख्यात विद्वान आहे, सर्वगुण संपन्न आहे. त्याला मी कसा नेऊ. असा विचार यमराज कधीच करत बसत नाही। अंतकाळ ही जबरदस्त वाईट वेळ आहे. जो जीव जन्माला आला तो एक दिवस मरणारचं आणि हे अंतिम सत्य आहे त्यासाठी निरोगी जाणीव ठेऊन आपले जीवन सार्थकी करून घ्यावे. वैभवसंपन्न माणूस, अगाध बुध्दीची प्रतिभा असलेला, प्रचंड पुरूषार्थ गाजवलेला, सगळे मरण पावलेले आहेत. मरणाने देह जरी नेला तरीही आपल्या कर्माने सदाचाराने वागून किर्ती रूपाने ऊरावे. ४५ ओव्याच्या पुढे तर समर्थ म्हणतात की जीवनाच्या विविध क्षेत्रात प्रचंड नाव कमावलेले गेले. ज्यांनी जगामध्ये ऊलथापालथ केली ते देखील मरणाला शरणं गेले. बळाचा वापर करणारे,भरपूर आयुष्य जगलेला, सगळ्यांना पोसणारे, धर्मरक्षण करणारे, हे आणि असे अनेक लोक गेले. प्रचंड बुद्धीवान गेले, अचाट वादविवाद करणारे, तापसी लोकांचे समुह गेले. विद्वान ब्राम्हणांचे समूह गेले. अनेक अनेक पिढ्या नाहीशा झाल्या पण संत महात्मेचे २. विचार मात्र अमर राहिले.

३. मित्रांनो या निरूपणाचा विचार केला तर एक लक्षात येते जीव जन्माला आला तो जगला ४. माझे माझे करून मरण्यापेक्षा सत्कर्म करत जगावे व सत्कर्म करूनच मरावे .५. श्री राम जय राम जय जय राम ६. जय जय रघूवीर सयर्थ।।

## नामाचे सूक्ष्म स्वरूप



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

नुसते राम राम म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य नोकरी नोकरी असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. रामनाम आणि नोकरी यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. राम राम म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वतःच्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा राम राम म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरूद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण राम राम म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे नोकरी नोकरी असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण राम राम म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चित आहे याचा अनुभव सर्वांना आहे. राम राम म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा नोकरी नोकरी म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच राम राम म्हणून राम मिळणे निश्चित आहे. सबब राम राम म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता राम राम जपावे. मनाच्या सर्व दुःखाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच; प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. मी पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.


जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

## ॥ संत महात्म्य ॥

**लेखक - मधुकर बोरीकर**
**9403061886**

### संत जनाबाई

**ज्योतिर्मय साहित्य**



या साधनमार्गात प्रत्येकाच्या अंगी असलेले तीन गुण म्हणजेच सत्व गुण, रजोगूण व तमोगुण. प्रतेक व्यक्तीत या तीन गुणांचे चे मिश्रण हे त्यांच्या रक्त मन व बुद्धीत घट्ट स्थिरावलेले असते. सर्वप्रथम तमोगुण कमी करावा लागतो. त्यासाठी साधना व इतर प्रयोग कसोशिने व सातत्याने करावे लागतात. हळुहळू तमोगुण आणि रजोगुण कमी होतात.उर्ध्व झालेला प्राण हा अग्नीमय होतो. यातही काही किल्मिषे जळून जातात. प्राण मन व अहंकार हे बुद्धीत आणि बुद्धी आत्म्याकडे स्थिरतेने वळली आणि हृदयात उमलेल्या भक्तीने ती स्थिर झाली म्हणजे बुद्धियोग पुर्ण होतो. बुद्धी सद्बुद्धी होते. राग, द्वेष, अस्मिता आणि अभिनिवेश हे संपून जातात. सत्वगुण ही नष्ट होऊन केवळ शुद्ध सत्व उरते. यालाच गुणातीत होणे असे म्हणतात.

चांग देव स्वतःला गुरु माता मुक्ताईच्या हाती असलेल्या शिशु स्वरूपात पाहतात. व

मातेने त्यांना योगसामर्थ्याने गुणातीत असलेल्या पाळण्यात झोपविले आहे असे सांगतात. आणि तेथे मी मुक्ताई चा सुत म्हणजे पुत्र आनंदात निद्रा घेतो आहे म्हणजे स्थिर झालो आहे हा भाव सांगतात.

निजी निज बाळा न करी पैं आळी/अनुहात टाळी वाजविते

या ओळीतून चांगदेव महाराज हे सांगू इच्छिता की अशा गुणातीत अवस्थेत मी निमग्न राहावे असे गुरू माता सुचविते.ही समाधीची स्थिती आहे. ही स्थिर झाल्यानंतर आणि जेव्हा निर्वी कल्प समाधीचा अनुभव दृढ व्हायला लागतो त्यावेळेस अनुहात ध्वनी ऐकावयास मिळतो. अनुहात किंवा अनाहत नाद म्हणजे आहाता शिवाय (आघाताशिवाय) होणारा ध्वनी. रक्तमनबुद्धीत शुद्ध सत्व अवतरल्याशिवाय हा ध्वनी गुरु शिष्यास ऐकवीत नाहीत. येथे चांगदेव महाराज म्हणतात मला या स्थितीत माझी गुरुमाऊली मुक्ताई हिने अनुहात नाद ऐकविला.

निद्रा ना जागृती भोगी पैं उन्मनी /लक्ष ते भेदूनी निजपाटी//

समाधिवस्थेत मन हे संपलेले असते. शब्द मावळलेले असतात. मंत्र आठवत नाहीत. आणि शून्यावस्थेकडे साधक सरकतो. ही समाधिची प्रगाढ अवस्था अवस्था असते.तिथे साधक अमर्याद काळोख्या गुहेत एकाकी होतो. आसपास कोणीही नाही यावेळेस जाणीव तर होते पण ती शब्दात मांडता येत नाही. साधक घाबरा होतो.या अवस्थेतून जागृत अवस्थेकडे सुद्धा येणे कठीण होते. साधकाला अशा वेळेस केवळ अनाहत नादाची साथ मिळते. सद्गुरु त्या नादाद्वारे साधकाला त्या निर्गुण अवस्थेत साथ देतो आणि पुन्हा अलगद व्यवहारावर आणून सोडतो. ही निद्रा म्हणावी तर जाणीव आहे आणि जागृती म्हणावी तर काहीच दिसत नाही. अशी ही अवस्था असते. विचारचक्र पूर्णपणे थांबलेले आहे या घनांधकार गुहेतून बाहेर पडणे हे लक्ष भेदण्यासारखे आहे व पुनश्च निजस्थानावर म्हणजे देह भावात येण्यासारखे आहे. आणि गुरु कृपेने ते शक्य झाले असे चांगदेव म्हणतात.

(क्रमशः)

## नीतिशतक निरूपण



अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**भग्नाशस्य करण्डपिण्डिततनोः म्लानेन्द्रियस्य क्षुधा**
**कृत्वाखुर्विवरं स्वयं निपतितो नक्तं मुखे भोगिनः ।**
**तृप्तस्तत्पिशितेन सत्वरमसौ तेनैव यातः पथा**
**लोकाः पश्यत दैवमेव हि नृणाम् वृद्धौ क्षये कारणम्**

अर्थ –

हे सज्जनांनो, पहा – एक उंदीर रात्री पेटीला छेद करतो. त्यात ज्याने आपले शरीर आकुंचित केले आहे, जो निराश व भूकेने व्याकुळ आहे, अशा सापाचा ग्रास बनतो. सर्प त्याच्या मांसाने तृप्त होतो. त्याच बीळातून बाहेर येतो, ज्याला उंदराने मार्ग म्हणून तयार केले होते. माणसांच्या समृद्धी आणि अधोगतीचे भाग्यच कारण आहे.

माणसांची प्रगती आणि त्याची अधोगती यांना केवळ कर्म नव्हे, तर त्याचे भाग्य देखील कारणीभूत आहे, असे प्रतिपादन भर्तृहरींनी येथे साप आणि उंदीर यांचे उदाहरण देऊन केले आहे.




## स्वस्त पण बहुगुणी तुरटी

**ज्योतिर्मय साहित्य**

खनिज घनता सुधारते

काळ्या उडीद डाळीमध्ये मॅग्नेशियम, पोटॅशियम, लोह आणि कॅल्शियम इत्यादी आवश्यक खनिजे आणि जीवनसत्त्वे असतात. हे सर्व पोषक आपल्या हाडांमधील खनिज घनता वाढवण्यास मदत करतात. हे खूप महत्वाचे आहे कारण जसजसे आपण वय वाढतो तसतशी आपली हाडे कमकुवत होत जातात. त्यामुळे आपण ऑस्टिओपोरोसिससारख्या हाडांशी संबंधित आजारांना बळी पडतो.

मधुमेहामध्ये फायदेशीर राहते

जर तुम्हाला मधुमेह असेल तर तुमच्या आहारात उडीद डाळ ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत होते. यामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे ते इंसुलिन सोडण्याचे नियमन करून तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करते.

हृदय निरोगी ठेवते

काळी उडीद डाळ तुमच्या हृदयाच्या आरोग्यासाठी देखील उत्तम आहे कारण त्यात फायबर, मॅग्नेशियम आणि पोटॅशियम जास्त प्रमाणात असते, त्यामुळे ते तुमच्या हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी प्रणालीला निरोगी ठेवण्यास मदत करू शकते. हे तुमच्या कोलेस्टेरॉलची पातळी संतुलित करते, जे तुमच्या हृदयासाठी उत्तम आहे.

साखरे ऐवजी गुळ का खावा?

फुफ्फुसातील संसर्ग रोखतो – गुळामुळे रक्त शुद्ध होत. चयापचयाचा वेगही नियंत्रित राहतो. याशिवाय घसा आणि फुफ्फुसाच्या संसर्गावरही गूळ फायदेशीर ठरतो.

पोटाच्या तक्रारींवर गुणकारी– पोटाच्या विविध तक्रारींवरही गूळ हा रामबाण उपाय आहे. गॅसेस, असिडीटीची तक्रार असेल तर, गूळ खाण्याने त्रास कमी होतो. आंबट ढेकरींपासून सुटका – गूळ, सैंधव आणि काळे मीठ एकत्र करून खाल्लं तर आंबट ढेकर येणं थांबते.

सांधे दुखत असतील तर गूळ आणि आलं एकत्र करून खाल्ल्यास फायदा होतो. दररोज आलं आणि गुळाचा एक खडा खाल्ल्यास सांधेदुखीला आराम पडतो.

गूळ खाण्यानं शरीराला ऊर्जा मिळते. थकवा दूर होतो. थकवा, कमजोरी जाणवत असेल तर जरूर गूळ खावा.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

रक्ताची कमतरता भरून निघते – गूळ हा लोहाचा मोठा स्रोत आहे. तुमचं हिमोग्लोबिन कमी झाले असेल तर रोज गूळ खाण्यानं तात्काळ फायदा होतो. गूळ खाण्यानं शरीरातील लाल पेशींची संख्या वाढते. त्यामुळे गर्भवती महिलांना डॉक्टर गूळ खाण्याचा सल्ला देतात. रक्तदाब नियंत्रणात राहतो – गुळामुळे रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. विशेषतः उच्च रक्तदाबाचा त्रास असणाऱ्या लोकांना गूळ खाण्याचा सल्ला दिला जातो. हाडं मजबूत होतात – गुळात कॅल्शियम आणि फॉस्फरस यांचं प्रमाण अधिक असतं. हाडांना बळकट करण्यात हे दोन्ही घटक महत्त्वाचे असतात. त्यामुळे गूळ खाण्यानं हाडांसाठीही लाभदायी ठरते. शरीर कार्यक्षम राहतं गुळामुळे शरीर मजबूत आणि कार्यक्षम राहते. शरीर ताकदवान बनवण्यासाठी दुधात गूळ घालून घेणे उपयुक्त ठरते. दुध आवडत नसल्यास एक कप पाण्यात पाच ग्रॅम गूळ, थोडासा लिंबू रस आणि काळे मीठ घालून प्यायल्यास थकवा दूर होईल. सर्दीवरही गुणकारी सर्दी–पडसं दूर करण्यासाठीही गूळ लाभदायी ठरतो. काळीमिरी आलं आणि गूळ मिसळून खाल्ल्यास सर्दी–पडसं कमी होतं. खोकला येत असेल तर साखरेऐवजी गूळ खाणं लाभकारक ठरतं. आल्याबरोबर गूळ गरम करून खाल्ल्यास घशातील खवखव, जळजळ दूर होते. डोळ्यांसाठीही लाभदायी – गूळ खाल्ल्यानं डोळ्यांची क्षीणता कमी होते. दृष्टी सुधारण्यासही मदत होते.





**ज्योतिर्मय साहित्य**


तुझा विचार योग्य दिशेने चाललाय. शंका निर्माण होणं हे चांगलं असतं.फक्त शंका निर्माण झाली तर त्या शंकेचा निराकरण करून न घेण्याचा प्रयत्न करणं हे मात्र वाईट असते. शंका निर्माण होणे वाईट नाहीये. निर्माण झालेल्या शंकेला दूर न करणं हे वाईट आहे. तू मला विचारलं, मी तुला सांगतो .काही नाही या सगळ्यावर एकच उपाय आहे .काय ?विचार करा. विचार करा. सारासार विचार करा. उठा उठी नाम धरा कंठी विठोबाचे सारासार विचारिता भ्रंती ते पाही. विचारिता निरसले प्रपंच सहज सांडवले मग तत्वतः

**कथा ऐकता ऐकता धावते संकलन**
**मधुकर बोरीकर, 9403061886**

तत्व उरले ज्ञान्याशी विचार करा. काही विचाराचे स्वरूप सगळं योग वशिष्ठ बृहक ग्रंथ आहे.पण सिद्धांत दृष्टीने प्रारब्धा पेक्षा प्रयत्नाला मानणारा हा ग्रंथ आहे.शेवटी हे सांगण्यात आलं की योगवासिष्ठ ग्रंथाच्या चिंतनाने काय मिळतं तर असा विचार प्रकट होतो .काय विचाराचा स्वरूप आहे ? या ग्रंथाच्या चिंतनाने जो विचार निर्माण होतो त्या विचाराचे स्वरूप असं आहे विचार हा समुद्रासारखा गंभीर हवा मेरु पर्वतासारखा स्थिर हवा आणि चंद्राप्रमाणे सर्वांना शीतलता देणारा असावा. तर त्याला विचार म्हणा. असा विचार योगवशिष्ठांनी सांगीतला आहे. प्राप्त होतो असे या ग्रंथाचे महात्म्य सांगण्यात आलं मग रामचंद्र प्रभू विश्वा मित्रांबरोबर अरण्या मध्ये जाण्याकरता सिद्ध झाले. आपण जेव्हा एखादी कृती करण्याकरता सिद्ध होतो त्याच्या पूर्वी आपल्या अंतकरणांमध्ये विचाराची परिपक्वता आणि ज्ञानाची सिद्धी झाली पाहिजे. ज्ञानाच्या अधिकारावर केलं गेलेलं कर्म हे आम्हाला कर्म बंधनातून सोडवत .यज्ञ रक्षण हे कर्म आहे .पण ते कर्म करण्याच्यापूर्वी योगवासिष्ठ या उपदेशातुन हे ज्ञानाचे डोळे घेऊन रामचंद्र प्रभू आणि लक्ष्मण यज्ञ रक्षणा करता गेले त्यांनी ते यज्ञ रक्षण केलं .ते यज्ञ रक्षण करताना ताटिकेचा वध केला .ते यज्ञ रक्षण करताना मारीच्या सुबाहू यांचा वध केला. **(क्रमशः)**

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

लक्ष्मीर परीक्षा  हे नाटक तर त्यांनी शांतिनिकेतन मध्ये शिकायला येणाऱ्या मुलींसाठी खास करून लिहिले. या नाटकात सगळी स्त्री पात्रेच आहेत. त्यात भूमिका करणाऱ्या देखील मुलीच होत्या. या नाटकात रवींद्रनाथांची सून प्रतिभादेवी हिने देखील भूमिका केली होती. हे नाटक पाहणाऱ्या देखील फक्त स्त्रियाच असाव्यात असे त्यांना वाटत होते. त्यामुळे सुरुवातीला या नाटकाला फक्त स्त्रियाच येत. स्वतः रवींद्रनाथांनी पडद्याआडून हा प्रयोग पाहिला आणि त्यात काम करणाऱ्या कलाकारांचे कौतुक केले होते. परंतु पुढे केवळ स्त्रियांनीच हे नाटक पहावे हा नियम त्यांनी काढून टाकला. या नाटकात त्यांनी निर्दयी, अन्यायी सामाजिक प्रथांवर प्रहार केले.

पुढील काळात लिहिलेल्या काही नाटकांमध्ये त्यांनी अध्यात्मिक विषयांना हात घातला. याचे कारण म्हणजे त्यांची स्वतःचीही आध्यात्मिक परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल सुरू होती. त्याचे प्रतिबिंब या नाटकांमध्ये उमटलेले दिसते. अशा नाटकांमध्ये  शारदोत्सव ,  राजा  यासारख्या नाटकांचा समावेश आहे. त्यांचे  राजा  हे नाटक आजच्या परिस्थितीवर देखील भाष्य करणारे आहे. आपण प्रजाहितदक्ष असल्याचा आव आणून राजे लोक आपला स्वार्थ कसा साधतात आणि आपली सत्ता कशाप्रकारे राखण्याचा प्रयत्न करतात हे यात दाखवले आहे. आजच्या राज्यकर्त्यांना देखील हे लागू पडते.

अचलायतन  आणि डाकघर या नाटकांमध्ये रवींद्रनाथांनी शिक्षणाच्या पारंपारिक पद्धतीवर कोरडे ओढल आहेत. शिक्षणाची पारंपारिक आणि प्रचलित पद्धती त्यांना मान्य नव्हतीच. त्यामुळेच त्यांनी शांतीनिकेतनची स्थापना केली होती हे आपल्याला माहिती आहे. अचलायतन या नाटकात त्यांनी शिक्षणाच्या नावाखाली मुलांची कोवळी मने मारली जातात, त्यांच्या विचारशक्तीला वाव दिला जात नाही, त्यांच्याकडून सक्तीने घोकंपट्टी करवून घेतली जाते आणि त्यालाच शिक्षण असे गोंडस नाव दिले जाते हे प्रभावीपणे दाखवले आहे. शिक्षणातील यासारख्या गोष्टी म्हणजे केवळ औपचारिकता. हे शिक्षण नव्हे असे त्यांनी या नाटकातून स्पष्ट केले आहे. डाकघर  या नाटकात एक मुलगा आजारी असल्यामुळे घरातच कोंडून राहतो. त्या मुलाचे भावविश्व आणि त्याच्या भोवतालची परिस्थिती त्यांनी प्रभावीपणे चित्रित केली आहे.



## जात्यावरच्या ओव्या.....

---

**नातेसंबंध : पती-पत्नी**

भाशी  करते सुन
मला भाशीसुन साजे
तिच्या तोडंपैंजण्यानं
माझं तळघर वाजे ||७७||

भाशी करते सुन
मला भाशीसुन नका
हिच्या बोला पायी
तुटन माझा प्राण सखा ||७८||

---

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## फुलमाला....



### घाणेरीची फुले

घाणेरी गुच्छात उमलते,
फुले असतात छोटी छोटी,
अनेक रंगात खुलती फुले,
ही झाडे लावतात कुंपणासाठी.


डोंगर,पठार,शेत,रस्ता
ही झाडे कुठेही सहज रुजतात,
अनेक गुणधर्म यांच्यामध्ये
औषधासाठी उपयोगी असतात...

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज.

# लोककवी वामनदादा कर्डक

**ज्योतिर्मय साहित्य**

महाराष्ट्राचे लोककवी, शाहीर, आंबेडकरी चळवळीचे बुलंद कार्यकर्ते आणि समाज प्रबोधनकार वामन तबाजी कर्डक यांची काल म्हणजे १५ मे रोजी २१ वी पुण्यतिथी होती. त्यांच्या २१ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा हा विशेष लेख.



वामनदादा कर्डक यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील देशपंडी या छोट्याशा खेड्यात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव तबाजी तर आईचे नाव सईबाई असे होते. त्यांना एक मोठा भाऊ आणि एक धाकटी बहीण होती. वामनदादा यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना शिक्षण घेता आले नाही. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने उदरनिर्वाहासाठी दादा मिळेल ती कामे करू लागले. जत्रा यात्रांमधून कुस्ती खेळू लागले त्यातून जे पैसे मिळत त्यातून ते घरखर्च चालवू लागले. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांचे लग्न झाले पण त्यांना कौटुंबिक स्वास्थ्य लाभले नाही. त्यांच्या पत्नीचे अकाली निधन झाले पुढे मुलाचेही निधन झाले. इतके मोठे दुःख उराशी बाळगून त्यांनी मुंबई गाठली. मुंबईत त्यांनी गिरणी कामगार म्हणून काम केले. बीडीडी चाळीत त्यांचे वास्तव्य असे तिथेच त्यांची  समता सैनिक दल आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांशी ओळख झाली. समता सैनिक दलातर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सभेचे आयोजन करण्यात त्यांचा पुढाकार असायचा. वामनदादांना लहानपणापासून गायनाची आवड होती. त्यांना मिळालेली प्रतिभा ही जन्मदत्त देणगी होती. लहानपणापासून गायनाची आवड असलेल्या वामनदादांकडे लेखणी, वाणी आणि संगीत यांचा त्रिवेणी संगम होता. एक दिवस फावल्या वेळेत ते राणीच्या बागेत बसले असताना त्यांनी एका हिंदी चित्रपट गीताचे विडंबन केले. ते गीत त्यांनी राणीच्या बागेतील गर्दीपुढे म्हटले. त्यांचे हे विडंबन गीत उपस्थित लोकांना खूप आवडले. त्यांचा आवाज आणि गाण्याचे बोल लोकांना आवडू लागले. पुढे ते आंबेडकरी जलशांमध्ये गाऊ लागले. विशेषतः ज्या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण असे त्याठिकाणी बाबासाहेबांच्या भाषणाआधी वामनदादांचे गाणे होत असे.बाबासाहेबांनी त्यांच्या गाण्याची स्तुती अनेकवेळा आपल्या भाषणांमधून केली आहे. बाबासाहेब म्हणत माझ्या दहा भाषणांचं काम शाहिरांचं एक गाणे करते. वामनदादांचे बहुतांश गीते हे लोकगीते आहेत. वामनदादांची गीते म्हणजे कोंडलेल्या मनाचा हुंकार. वामन दादांच्या गीतांचा केंद्रबिंदू हा मानव होता म्हणूनच वामनदादा म्हणतात मानवा इथे मी तुझे गीत गावे.... तुझे गीत व्हावे मानवता. आंबेडकर भक्ती, दलित, शोषित,  स्त्रीमुक्ती, जातीव्यवस्था यावर वामन दादांनी आपल्या गीतातून प्रबोधन केले. दादांनी आपल्या गीतातून हुंडाबळी, ऊसतोड कामगार, पर्यावरण, कामगार, शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळ यावरही भाष्य केले. त्यांच्या गीतांचे प्रेरणास्थान डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच होते. वामन दादांनी स्वतःला भीमकार्यात वाहून घेतले. दादांनी आपल्या असंख्य लोकगीतांतून लोकांना भुरळ घातली. म्हणूनच ते लोककवी झाले. दादांनी आयुष्यभर आंबेडकरी विचारांची पताका आपल्या खांद्यावर खंबीरपणे वाहिली. आपल्या तेजस्वी लेखणीने आणि कणखर वाणीने फुले, शाहू, आंबेडकर घराघरांत पोहचवणाऱ्या या महाकवीचे १५ मे २००४ रोजी निधन झाले. लोककवी वामन दादा कर्डक यांना २१ व्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# संगीतप्रधान अष्टपदीचा उत्कंठावर्धक ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला

## ३० मे रोजी प्रदर्शित संपूर्ण महाराष्ट्रात होणार प्रदर्शित

**ज्योतिर्मय साहित्य**

अष्टपदी हा मराठी चित्रपट पाहण्यासाठी आता प्रेक्षकांना फार वाट पाहावी लागणार नाही. ३० मे रोजी अष्टपदी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. त्यापूर्वी या चित्रपटाची उत्कंठावर्धक झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. अष्टपदीचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने रसिकांना एक संगीतप्रधान कौटुंबिक कलाकृती पाहायला मिळणार आहे. प्रदर्शित झालेल्या अष्टपदीच्या ट्रेलरच्या काव्यमय सुरुवातीला प्रेक्षकांची पसंती मिळत आहे.

महश्री प्रॉडक्शन आणि युवराज सिने क्रिएशनच्या बॅनरखाली निर्माते उत्कर्ष जैन आणि महेंद्र पाटील यांनी अष्टपदी चित्रपटाची निर्मिती केली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शनही निर्माते उत्कर्ष जैन यांनीच केले आहे. क्रिएटिव्ह दिग्दर्शक महेंद्र पाटील यांनी कथा, पटकथा व संवाद लेखन केलं आहे. प्रदर्शित करण्यात आलेला अष्टपदीचा ट्रेलर खऱ्या अर्थाने चित्रपटाची झलक दाखवणारा आहे. कुणीच नसावं अवतीभवती, समोर तू असताना... अशा काव्यरचनेने अष्टपदीचा ट्रेलर सुरू होतो. त्यानंतर संतोष जुवेकरच्या रूपातील कवीमनाचा नायक दिसतो आणि त्याने जिच्यासाठी हे काव्य म्हटले ती नायिका मयुरी कापडणेही लक्ष वेधून घेते. प्रेमाचे विविध रंग उधळणारी दृश्ये ट्रेलरमध्ये पाहायला मिळतात, जी अष्टपदीबाबत उत्सुकता वाढवतात. थोडक्यात काय तर या चित्रपटात प्रेमाची अनोखी व्याख्या पाहायला मिळणार असल्याचे ट्रेलर पाहिल्यावर जाणवते. याला सुमधूर गीत-संगीत आणि अर्थपूर्ण संवादांची जोड देण्यात आली आहे. दोन नायक आणि एक नायिका असलेल्या या चित्रपटात खरं प्रेम कुणाला मिळतं हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे. सशक्त कथानक, उत्कंठा वाढवणारी पटकथा, सहजसुंदर अभिनय, प्रयोगशील दिग्दर्शन आणि दर्जेदार निर्मितीमूल्ये यांच्या आधारे अष्टपदी हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनावर गारूड घालण्यासाठी सज्ज झाला आहे. अष्टपदीबाबत निर्माते-दिग्दर्शक उत्कर्ष जैन म्हणाले की, हा चित्रपट प्रेमाची नवी व्याख्या मांडणारा आहे. प्रेमाचे आजवर कधीही समोर न आलेले पैलू पाहताना प्रत्येक रसिकांना कुठे ना कुठे त्यात आपले प्रतिबिंब दिसेल. आजच्या काळातील नातेसंबंधांवर भाष्य करणारा हा चित्रपट म्हणजे सर्वतोपरी मनोरंजनाचे परिपूर्ण पॅकेज असल्याचे अष्टपदी पाहताना रसिकांना जाणवेल. अष्टपदी या चित्रपटाला जर आर्थिक यश लाभलं तर त्यातील काही भाग राष्ट्रीय संरक्षण निधीला देणार असल्याचे उत्कर्ष जैन यांनी सांगितले.




अष्टपदीमध्ये संतोष आणि मयुरी यांच्या जोडीला अभिनय पाटेकर, मिलिंद फाटक, मोना कामत, स्वप्नील राजशेखर, माधव अभ्यंकर, विशाल अर्जुन, विनिता काळे, चंदा सारसेकर, कल्पना राणे, विशाल अर्जुन, उत्कर्ष जैन, महेंद्र पाटील, नयना बिडवे या कलाकारांचाही समावेश आहे. गणेश चेऊलकर आणि प्रशांत जामदार यांनी लिहिलेल्या अर्थपूर्ण गीतरचनांना संगीतकार मिलिंद मोरे यांनी सुमधूर स्वरसाज चढवला आहे. मिलिंद मोरे यांनीच या चित्रपटाला पार्श्वसंगीतही दिलं असून, कला दिग्दर्शन निलेश रसाळ यांनी केलं आहे. रंगभूषा अतुल शिधये यांनी, तर वेशभूषा अंजली खोब्रेकर व स्वप्ना राऊत यांनी केली आहे. डिओपी धनराज वाघ यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून नृत्य दिग्दर्शन दिग्विजय जोशी यांनी केले आहे. अजय खाडे अष्टपदीचे कार्यकारी निर्माते आहेत, तर राहुल पाटील आणि नंदू आचरेकर सहदिग्दर्शक आहेत.

# प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांची करिअर कट्टाच्या राज्यस्तरीय समन्वय समितीच्या सदस्यपदी नियुक्ती

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. नितीन घोरपडे यांचा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत राज्यस्तरीय समन्वय समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच डॉ. नीता कांबळे यांची करिअर कट्टा व गर्जे मराठी ग्लोबल राज्यस्तरीय समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली असल्याचे महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी कळविले आहे.

या नियुक्तीबद्दल पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव संदीप कदम, खजिनदार मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार व ए. एम.जाधव, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रशांत मुळे, डॉ. शुभांगी औटी, प्रा. अनिल जगताप, प्रा. विलास शिंदे, यांनी प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे व डॉ. नीता कांबळे यांचे अभिनंदन केले.





## इंदापुरी निखारे

### नवीन बांधकाम...




**ज्योतिर्मय साहित्य**

नवीन बांधकाम...
नवीन ठेकेदार... नवीन मजूर...
त्यांची बायका मुलांची...
तात्पुरती राहण्याची व्यवस्था...
बहुतेक मजूर आणि त्याची बायको...
रोजंदारी करणारे...
त्यांची मुलं, मुली... शाळेत जाणारी...
एक दिवस... एका मजूर जोडप्याची मुलगी...
शाळेतून परत आली नाही...
त्यांनी शोधाशोध केली... पण नाही सापडली...
दुसऱ्या दिवशी... एका साहेबाला सांगितले... तो म्हणाला... संध्याकाळी पोलिसांना जाऊन सांगा...
संध्याकाळी पोलीस स्टेशन मध्ये...पोलिसांनी सांगितले... सापडली तर तुम्हाला सांगतो...
एकंदरीत त्यांच्या लक्षात आले...
मुलीला आपणच शोधायला हवे...
पण ते शक्य नव्हते... म्हणून थोडासा दुखवटा...
मजुरांच्या साथीने व्यक्त केला...मुलीचे स्मृतीचित्र...ती शाळेत जाताना... शाळेचा गणवेश... पाठीवर दप्तर...
पाठमोरी जाताना... नजरेआड होई पर्यंत...
डोळ्यातील कौतुकाचे भाव...कष्टाचा आनंद देत असे... त्या आईबाबाला... ८/९ वर्षे होऊन गेली...
अधूनमधून आठवण येत असे...काम करण्याचा...
जगण्याचा आनंद हरवून गेला...
एकाच मुलाला किंवा मुलीला जन्म द्यायचा...असे ठरवले होते...पण एव्हढे साधे स्वप्नं...नियतीने मान्य केले नाही...
आता दोघे जगत होते...वाट पहात पहात...
मुलगी केव्हातरी येईल याची...किंवा अंतिम सत्याची... ८/९ वर्षे होऊन गेली...एक दिवस दोघे असेच... चंद्र किरणाच्या एका... प्रकाश रेषेकडे... ओलावलेल्या डोळ्यातील अश्रूच्या भावनांना... ऊबदार आठवणी त्यांच्या मुलीच्या... ती असती तर लग्नाची तयारी केली असती... तशी केव्हाही आली तरी...
पैसे कमी पडणार नाही... जमवून ठेवले आहेत...
तिच्याचसाठी... आणि एक दिवस...
ती येते...बरोबर दोन लहान मुले...
आईबाप एकदम आनंदाने खूष...
तीने काय झाले? ते सांगण्याचा प्रयत्न केला...
पण त्यांनी ऐकले नाही....उपेक्षित जगणं...
अत्याचार सहन करणे... यालाच जीवन म्हणतात...
ही तुझी मुलं ना... बाकी जाऊदे...
नियतीने तिचा खेळ खेळला होता...
त्याचबरोबर प्रचंड आनंदाने जगण्यासाठी...
मुलीला आणि तिच्या दोन मुलांना...
भविष्याचे स्वप्न दिले आहे... मुलांच्या भविष्यासाठी... तीने झालेल्या अत्याचाराचा अग्नी... मनात कायम पेटत ठेवण्याचा निश्चय केला...कारण पण तसेच... कोणी ऐकणार नाही... विश्वास पण ठेवणार नाही...
तिला शाळेतून घरी येत असतांना...
पळवून नेले... दीड दोन लाखाला विकून टाकले...
नंतर त्याने तीन लाखाला विकून टाकले...
ते दोघे म्हणाले...तुझे लग्न झाले आमच्याबरोबर...
दोन मुलं झाली... आणि एक दिवस म्हणाले...
आपला घटस्फोट झाला... हाकलून दिले...
जगत कशाला असतो आपण?
कोणाचेतरी स्वप्न पूर्ण करण्यासाठी...
आनंदात मरण्यासाठी... द्वेष, मत्सर... जात धर्म...
अस्मिता... याचा संबंध जगण्यासाठी नसतो...
आणि गरिबीशी, भुकेशी तर नसतोच...

***

# माज्या गावचा आकर

ज्योतिर्मय साहित्य

झाडाझुडपात, लुकून आये त्या माज्या लाहानस्या गावाचं नाव भटेगाव आये. तई त्यागावात साट, सत्तर घरा होतं. कोनाचं मेड्यांचं घरा होतं तं, कोनाच्या गवताच्या खोपड्या होत्या. सप्पाई समाजाचं लोका गावात मिरून, मिसरून सऱ्यानं राहत होतं येवड्याई गावबरचे लोका कास्तकारी करत होतं, कोनी गरीब, होतं तं कोनी पाटेल होतं, कोनी मोट्यानं स्यावकार होतं पन, माज्या गावात मातरं सुक पावालं मिरत होतं. गाव कास्तकारी करनारं होतं मनून सऱ्यानं घरोना, घरी गाई, बैला, सेऱ्या होतं, तं कोनाच्या घरी कोटाभर गाई चवत, कोटोलिबर सेऱ्या चवतं, बईलाच्या दोन, दोन जोड्या रायेतं, तेवड्या मोट्या गाई राकावाचा कसा मनून सऱ्यानं गावात राहानाऱ्या येका मानसाला गाई राकावासाटि गायकि मनूस सऱ्यानं ठेवतं होतं माज्या गावात सप्पाच्या पईलचा गायकि ''शामलाल होळी'' यालं ठेवलं होतं मोटा इमानदार मानूस होता अना त्याच्या घराजवर गाईचा मोटाडगर आकर होता. सकारी दाहा वाजता गावात मोट्या जोराना हाका मारत हिंड ''गाई, सेऱ्या, बैला सोडा वं'' येका गनिना गावबरचे गाई, ढोरा जमा होत अना मंग तो, त्याईलं खेदत, खेदत जंगलात चारावालं ने, दिवसबऱ्याई गाई, ढोरा, सेऱ्याईलं दावून आनं अना कोनाची गाय लंगडी झालि तं तिलं घरी, नेवून दे, त्याची बायको अना त्याची माय संगा, संगा जंगलात जातं होतं तिगेई मिरून सऱ्यानं गाई राकत होतं बुहूदिवस त्याईनं गाई राकन्याचा धंदा केलं मनून सऱ्यानं अजई गायक्याचा घर मनून त्यायचि वळक आये. मोट्या बरसादित गाई राकावालं जंगलात ने तई संगा, सातोडि, मेनकापड, दुद्यात पानी अना हातात काडी राये. दवात येक कांबरा अना डोस्क्यालं फेटा दिसं. मोटा इमानदार गायकि होता मनून सऱ्यानं आकर जई पायला तई भरलाच दिसं. त्या आकराना गावालं सोबा येत होती. सेनोड्याचं वरी सेन सावटत रायेतं अना रस्त्याच्या मेरलं सेनाचा मोटाडगर खाताचा गड्डा पावालं मिरं. कोनी गाईचा गोमूत्र धरावासाटि आकरावर जातं होतं. गाईचा आकर भरला पावूस सऱ्यानं गायक्यालं मोट्यानं मान देतं होतं दर सनालं सिदा, बोजारा त्यालं देतं, तं कोनी धोतर, गमच्या देत, गायक्याच्या बायकोलं कोनी लुगडा देतं तं कोनी झ्यांपरचा पिस देतं, त्यालं कोनीच काई मनत नोहोते. येकाद्या दिसि गाय करपातून खुडून गेली असल तं तिलं तो सोता ढेंगा बांद नाई नं पायात चिपळि बांद नाई तं टलगंटलग वाजनारा मोटाडगर घाटरू बांदून दे होता. असा तो गायकि गावाचा आदार झाला होता.

दिवारीच्या दिसि फुलिनं गाटवलेला मोटा साजरा येक, येक गाटा घरोना, घरी नेवून देत होता. गाईच्या दिसि येटारात गायगोदन भरं त्या गोदनाचि पुंजा करत होता, लोका मोट्यानं फट्याक्या फोडतं जसा ढोबरात लाया फुटल्यावानी अवाज येत होता. तई येक सत्व होता गायकि गोदनाजवर येक कांबरा हातरं अना गाईलं हैय, हैय असा मनल्यावर येक ना येक गाय कांबऱ्यावर येवून बसं मंग घडीबऱ्याना येवड्याई गाईचा करप खेदत, खेदत जंगलात नेत होता. तसा पावालं गेला तं गायक्याचा जीवन मोट्या दुकाचा आये गा उब्या बरसादित तो जंगलात रायते तई कई, कई ईजा लवतेत तं अबारई गरजते तरी तो गायकि सोताचा काम करते पन कोनाचा नुसकान होवू नाई दे.त्यालं कई, कई वाग, आस्वल चवते तं कई मोटं, मोटं सरप चवतेत तरी त्यायलं तो बियतं नाई कारन त्यालं गाईवासराचा



सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

आसिरवाद मिरत रायते. माज्या गावचा गायकि गरीब होता अना मोटा समजदार मानूस होता, कोनी राकन नाई देलनं तरी काई मनत नोहोता. कोनाची गाय, सेरी जंगलात जंदलि का त्या लाहानस्या वासरालं, पांटरालं धरून सऱ्यानं घरी आनून देत होता. मंग त्या निकाल कामाचा दाहा रूपये बोजारा देत होतं. माजा गाव झाडीत लुकला आये मनमनाने जंगल आये त्या जंगलात डुंबर सात्या, सेरडिरे, अरतफरीचि भाजी, कोल्यारीचि भाजी अना बुहुकाई भाजीचा मिरते तो भाजीचा कोनाकोनालं आनून दे. काई लाहान पोराईलं सोनपाकरू आनून दे असा ईमानदार माज्या गावचा गायकि होता. त्याच्या कस्टाना गाई, ढोराईना आकर भरला चवं, बरसादित गाई आकरातूना परतेत मनून सऱ्यानं गावातील लोका गोवाडी करून देतं. माज्या गावात त्या आकरावर सिंमग्याच्या दिसि



होरी पेटवत होतं, कोनी भजन मनत तं कोनी नकला करत, लाहान पोरा लुकालुकि खेळतं लोकाईच्या पाई तो गाईचा आकर सप्पाईझनालं घरासारका लागत होता. काई दिसाना तो गायकि मरून गेला. बहुमोटं गायकि झालं पन तसा गायकि नाई हरूहरू गावातल्या गाई कमी झाल्या अना करप चवत नोहोता आतंही तेवड्या गाई चवत नाई, कोनी खाटक्यालं ईकतेत तं कोनाचा माईत नाई सप्पा मुरत गेल्या अना माज्या गावचा आकर सुना झाला. कई, कई मायेरालं जातो अना त्या आकराकडं पायतो तं मालं लाहानपनीच्या आटवनी येतेत अना डोरा, डोरा पानी येते.असा होता माज्या गावातील पईलं गाईचा आकर अना गावातील लोका तसाच स्याहाना, समजदार गायकि होता अज तसं जुनं दिसं कोटी चवत नाई अना जुना काई रायला नाई. माज्या गावचा गाईचा आकर आतं सुना झाला गाई खंडीबर चवत नाई अना घाटरू, घुंगराचं अवाज तेवड्यान पईलच्या वानी आयकावालं मिरं नाई. कोटी गेली गा जुनी संस्कृती अना कोटी लुकले गा जुनं ईचार.? आता सप्पा नवा, नवा चवते.

# गौरव अभिजात मराठी सोहळा -२५ उत्साहात

## २२ काव्यसंग्रहाचे प्रकाशन, साहित्यिकांचा मानपत्र देऊन सत्कार

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – नागपूर येथील मराठीचे शिलेदार बहुउद्देशीय संस्थेतर्फे आयोजित गौरव अभिजात मराठी २०२५ कार्यक्रमात भव्य राज्यस्तरीय पुस्तक प्रकाशन सोहळा व राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धा उत्साहात पार पडली. भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद सभागृहात आयोजित कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. शिक्षक आमदार विक्रम काळे अध्यक्षस्थानी होते. सोहळ्याचे उद्घाटन प्रभारी प्राचार्य डॉ. पद्मा जाधव-वाखुरे यांनी केले. याप्रसंगी नरेश शेळके, डॉ. बालाजी जाधव, ए. बी. पठाण, अरविंद उरकुडे, अशोक लांडगे, ज्येष्ठ कवयित्री स्वाती मराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. नागपूरच्या मराठीचे शिलेदार समूह बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आयोजन समितीमध्ये डॉ. पद्मा जाधव, विजय शिर्के, विष्णू संकपाळ, अकील पठाण, वर्षा मोटे व प्रशांत ठाकरे यांचा समावेश होता.

साहित्यविश्वाला गवसणी

उद्घाटनपर भाषणात डॉ. पद्मा जाधव यांनी मराठीच्या सक्षमीकरणासाठी शासन राबवित असलेल्या अनेक उपक्रमांची माहिती दिली. आगामी



काळात साहित्य विश्वाला गवसणी घालणाऱ्या नवनवीन साहित्याची निर्मिती होणार असल्याचे जाधव म्हणाल्या. मुख्य अतिथी नरेश शेळके यांनी मराठी हीच आपली मातृभाषा आहे व मराठीतून शिकाल तरच टिकाल हे अधोरेखित करताना माय मराठीच्या सक्षमीकरणासाठी सर्वांनी पुढे येण्याची गरज प्रतिपादन केली. प्रसिद्ध शिवव्याख्याते व कीर्तनकार डॉ. बालाजी जाधव यांनी मराठीच्या सार्वत्रिकरणावर भर दिला. ए.बी. पठाण यांनी मराठी हीच आपली कर्मभाषा असल्याचे गौरवाद्गार काढले.

याप्रसंगी तब्बल २२ काव्यसंग्रहाचे दिमाखात प्रकाशन करण्यात आले. अतिथींच्या हस्ते गौरव अभिजात मराठी २०२५ या विशेषांकाचेही प्रकाशन यावेळी करण्यात आले. सोनप्रहर, मंगलता, काव्यसाधना, सख्या रे, काव्यांजली, विराजणीय भाग-२, आठवांचे निखारे आदी अनेक काव्यसंग्रहांच्या रूपाने मराठीचे साहित्य अधिकाधिक समृद्ध करण्यात आले.

मराठीचे शिलेदार समूहाचे प्रमुख राहुल पाटील यांनी मराठी सक्षमीकरण्यासाठी संस्थेद्वारा करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची माहिती दिली. द्वितीय सत्रात राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेत ५८ कवींनी सहभाग नोंदविला. पुणे जिल्ह्यातील कवयित्री सिंधू बनसोडे यांचा प्रथम, सिंधू बोदले यांचा द्वितीय, तर ज्येष्ठ साहित्यिक नागोराव सोनकुसरे यांचा तृतीय क्रमांक आला. प्रसिद्ध कवयित्री व लेखिका अनिता व्यवहारे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

सोहळा यशस्वी करण्यासाठी वैशाली अंड्रस्कर (चंद्रपूर), सविता पाटील ठाकरे, प्रशांत ठाकरे (सिलवासा), तारका रूखमोडे (गोंदिया), उर्मी घरत (पालघर) , प्रतिमा नंदेश्वर (चंद्रपूर), वृंदा करमरकर (सांगली), विष्णू संकपाळ (छत्रपती संभाजीनगर), संग्राम कुमठेकर (लातूर), हंसराज खोब्रागडे( गोंदिया) रजत डेकाटे (नागपूर), शर्मिला देशमुख घुमरे (बीड) यांचे बहुमोल सहकार्य लाभले. सूत्रसंचालन सविता पाटील ठाकरे, प्रशांत ठाकरे व विष्णू संकपाळ यांनी केले, तर आभार कवयित्री वर्षा मोटे पंडित यांनी मानले.

# प्रा.भगवान गावित यांची करिअर कट्टा व गर्जे मराठी ग्लोबल राज्यस्तरीय समिती तसेच प्रकाशन समितीच्या सदस्यपदी नियुक्ती

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शंकरराव भेलके महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. भगवान केशव गावित यांचा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत राज्यस्तरीय करीअर कट्टा समिती व गर्जे मराठी ग्लोबल समिती तसेच राज्यस्तरीय प्रकाशन समिती सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली असल्याचे महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी कळविले आहे.



या नियुक्तीबद्दल पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव संदीप कदम, खजिनदार मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार व ए. एम.जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोल, सर्व प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचारी यांनी ग्रंथपाल प्रा. भगवान गावित यांचे अभिनंदन केले.

# मयूर उद्यानाच्या तांत्रिक माहितीचा माझा अभाव...

ज्योतिर्मय साहित्य

स्व.आ.केशवराव धोंडगे यांचा प्रभाव कंधारच्या जन सामान्यांवर होता. विधान सभागृहात आपल्या धारदार वक्तव्याने सत्ताधारी पक्षावर अंकूश ठेवणारे नेते.पाच वेळा विधानसभा सदस्य व एक वेळेस लोकसभा सदस्य म्हणून लाल पावट्याचा झेंडा खांद्यावर घेऊन फिरणारे नेते. भगव्या लाटेत सुध्दा केशवरावजीनी लाल पावटा सोडला नाही पण भगव्याचा विरोधही त्यांनी केला नव्हता... भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे स्वागत अत्तर लावून करणारा जननायक ! सामान्याचे प्रश्न शासन दरबारी आक्रमक शैलीत मांडतांना उपरोध व उपहास याचा अजोड संगम त्यांच्या विनोदी शैलीत ऐकायला मिळायचा ! नेतृत्व, कर्तृत्व व वक्तृत्व याचा अनोखा संगम असलेला स्वाभिमानी व लोकसंग्रहक नेता ज्याला वयाच्या १०२ वर्ष वयोमान लाभले होते....

लाल कंधारी गोवंशाच्या जातीला अखिल भारतीय पातळीवर मान्यता मिळावी म्हणून लढा दिला. मान्यता मिळाल्यावर चेन्नई येथिल अखिल भारतिय पशु प्रदर्शनातील सहभागी व पुरस्कार प्राप्त लाल कंधारी पशूंचा व पशुपालकांचा सत्कार त्यांच्या मुक्ताई बंगल्याच्या प्रांगणात १९९३ च्या कोजागिरीच्या रात्री व चंद्राच्या मंद प्रकाशात केला होता तो सोहळा माझ्या विस्मृतीत जाणारा नाही....!

दर तिन महिन्यांनी कंधार तहसिल कार्यालयात समन्वय समितीची बैठक आमदारांच्या अध्यक्षतेखाली संपन्न व्हायची. त्यात सर्व खात्याचा विकास आढावा व पुढील वाटचालीवर चर्चा व्हायची. तसेच कामचुकार व भ्रष्ट अधिकाऱ्यावर कडक शब्दात हजेरी घेतल्या जाई. समन्वय बैठकीत कांहीच्या तक्रारीचा प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयात पाठवला जाई. पशुसंवर्धन विभागाबाबत आ.धोंडगे साहेबांचे मत चांगले होते.







त्याला कारण लोकाभिमुख व कार्यकूशल पशुवैद्य स्व.डॉ. व्हि.डी. आष्टूरकर डॉ. व्हि.डी. जहागिरदार यांच्या कडे जाते. त्यांनी पशु पालिकांत एक वेगळी पशुवैद्यकाची प्रतिमा निर्माण केलेली होती. व ती जपवणूक कशी होईल याचा विचार मी माझ्या कंधारच्या सेवाकार्य कालावधीत केला होता !

एका समन्वय समिती बैठकीत कंधारच्या राष्ट्रकुल कालीन भुईकोट किल्ल्यात मयुर उद्यान तयार करण्या बाबत आदेश देण्यात आला.

माझ्या कडे प.वै.दवाखाना कंधारचा चार्ज असल्याने मयुर उद्यानाचे दाईत्व माझ्या कडे होते. आमच्या कॉलेजच्या अभ्यासक्रमात वन्य पशु-पक्षा बाबत कोणताच विषय शिकवला जात नव्हता. सध्याच्या काळा सारखी गुगल इंटरनेट माहितीची व तात्काळ मोबाईल संपर्काची सुविधा त्या काळात नव्हती. माझ्या व स्व.डॉ.आष्टूरकर यांच्या चर्चे प्रमाणे एका पॉट मध्ये पक्षी खाद्य व कांही औषधांची सँम्पल किल्ल्याच्या दर्शनी भागात ठेवले होते. पण त्याच काळात मोरांच्या आजार व प्रतिबंधासाठी बोरीवली संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात कार्यरत असलेले वर्गमित्र डॉ. रणधीर बाराहाते होते. त्या काळात डॉ. बाराहाते यांनी होमिओ औषधी वापरुन वन्य प्राण्याचे गँग्रीन सारख्या आजारावर यशस्वी उपचार केले होते. त्या कामाची दखल सर्व दूरदर्शन विविध सर्वच वाहिन्यांनी व बऱ्याच दैनिक व नियतकालीकांनी घेतलेली होती. त्यामुळे मयूर उद्याना बाबत तांत्रिक माहिती साठी डॉ.बाराहातेना जोडपोस्टकार्ड पाठवले होते. आठ दिवसांनी त्यांनी उत्तरा दाखल मार्गदर्शन केले की, मोरांची देखभाल नैसर्गिक पध्दतीने करावी, कोणतेही पक्षी खाद्यची गरज मोरांना नसते व मोर सर्व पोल्ट्री रोगा पासून मुक्त आहेत. त्यामुळे लसीकरण करु नये. त्या प्रमाणे आम्ही दर्शनी भागात ठेवलेले पक्षीखाद्य, औषधी बाटल काढून घेतल्या होत्या.

आज ही मोराच्या संगोपनाच्या माझ्या तांत्रिक अज्ञाना बाबत आज ही खूप खंत वाटते....! तसेच वर्गमित्र डॉ. रणधीर बाराहाते यांनी केलेल्या तांत्रिक ज्ञानाबाबत कृतज्ञतेची भावना माझ्या मनात कायम स्वरुपी आहे !




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559